# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४४/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) सौ. सुखदेवी सत्याप्पा बिरादार,<br>वॉर्ड क्र.२५/२११,<br>शहापूर, इचलकरंजी,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. | अपेलंट |

**<u>विरूध्द</u>**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,<br><u>कोल्हापूर.</u><br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>संवसु शहर उपविभाग "ब",<br>इचलकरंजी, जि.कोल्हापूर.<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु शहर उपविभाग "ब"<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :-** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

सौ. सुखदेवी सत्याप्पा बिरादार, वॉर्ड क्र.२५/२११, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी त्यांचे सद्याच्या ठिकाणी असलेले ८ अश्वशक्ती हातगाम यंत्र वीज कनेक्शनची जोडणी दुस–या बाजुने / रोहित्रावरून देणेस दि. १२–७–२००६ रोजी वितरण कंपनीकडे अर्ज दिला आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. सदर कनेक्शनची जागा बदलून मिळावे व कार्यवाहीस विलंबामुळे नुकसान भरपाई मिळावे अशी अर्ज मागणी आहे. याबाबत तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर येथे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. १०–१०–२००७ चे पत्राने निर्णय दिला आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी दि. ८–१–२००८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संवसु विभाग कार्यालय, स्टेशन रोड, इचलकरंजी येथे ते या वेळेत झाली. त्यावेळी स्वत: तक्रारदार उपस्थित नव्हत्या परंतू प्रतिनिधी श्री. सत्याप्पा मलकाप्पा बिरादार, विरूध्द पक्षा तर्फे श्री. एस.आर. कांबळे, कार्यकारी अभियंता, विभाग इचलकरंजी, श्री. माने, उपकार्यकारी अभियंता, शहर “ब“ उपविभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, शाखा शहापूर हे उपस्थित होते.

याबाबत अपीलदाराचे तक्रारीचे स्वरूप व म्हणणे खालील प्रमाणे आहे –

सौ. सुखदेवी सत्याप्पा बिरादार, वॉर्ड क्र.२५/२११, शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे ८ अश्वशक्तीचे हातमाग यंत्र वीज कनेक्शन आहे. सदर कनेक्शनचे सर्व्हिस वायर ज्या शेजारील रिकाम्या प्लॉटवरून आलेले आहे त्या प्लॉटचे मालकाचे तेथे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी त्यांनी सदर कनेक्शन दुस–या बाजूने /रोहित्रावरून बदलून द्यावे यासाठी दि. १२–७–२००६ रोजी विद्युत कंपनीकडे अर्ज दिला आहे. अद्याप कार्यवाही झालेली नाही. याबाबत कनेक्शन बदलाची कार्यवाही व्हावी व कार्यवहीस झालेल्या विलंबामुळे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे.

याबाबत वितरण कंपनीचे म्हणणे कि, सौ. सुखदेवी सत्याप्पा बिरादार यांचे ८ अश्वशक्तीचे यंत्रमाग यंत्र वीज कनेक्शनचे सर्व्हिस कनेक्शन दुसरीकडून बदलून देणेस, दुस–या रोहित्रावर लोड शिल्लक नसलेने जोडून देता येत नाही. तर सद्याच्या जोडणी असलेल्या रोहित्रावर बदलून देणे असलेस शक्य होईल परंतू त्यासाठी सिंगल फेज एकटी लाईनचे थ्री फेजमध्ये रूपांतर करावे लागेल, सदर रूपांतर कामास येणार असलेला खर्च ग्राहकाला भरावा लागेल असे सांगण्यात आले व ग्राहक या मागणीला व वाहिनी रूपांतर करणेचा खर्च भरणेस संमतीपत्र देणेस तयार नाही असे सांगण्यात आले.

सर्व कागदपत्रे, तक्रारदार व वि.प. यांनी केलेले कथन यांचा एकत्रित विचार करता मंचाच्या निदर्शनास खालील बाबी आल्या.

१) दि. १२–७–०६ रोजी कनेक्शनचे सर्व्हिस वायर बदलून दुसरीकडून देण्यास अर्ज मिळाला परंतू आतापर्यंत नेमके किती लांबीची वाहिनी रूपांतरित करावी लागेल किंवा जादा टाकावी लागेल याचा किती खर्च ग्राहकास भरावा लागेल हे आतापर्यंत दीड वर्ष होईतो म्हणजेच या मंचाच्या कामकाजाचे तारखेपर्यंत उपकार्यकारी अभियंता “ब“ उपविभाग यांचेकडून ग्राहकास कळविलेला नाही.

२) नजीकचे रोहित्राची क्षमता वाढ केल्यास, कोणताही जादा खर्च ग्राहकाकडून न घेता, कनेक्शन बदलून देता येईल, वरील रोहित्र मंजुरीस योजना उपलब्ध नाही असे सांगितले.

३) ग्राहकाने नुकसान भरपाईची मागणी केली आहे परंतू कनेक्शन बदलून घेणेची मागणी स्वत:चे मर्जीने केलेली असलेमुळे वितरण कंपनीच्या नियमानुसार खर्च भरावा लागेल व विलंब झाल्याने नुकसान भरपाई मिळण्याची तरतूद नाही.

# आदेश

१) सद्या चालू असलेले थ्री फेज कनेक्शन दुस–या बाजूने बदलून देणेची मागणी ग्राहकाने स्वत:चे मर्जीने केलेली असलेमुळे वितरण कंपनीच्या नियमानुसार याकामी येणारा खर्च भरून काम करून घेणे.

२) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( एस.आर बांबळे )
सदस्य–सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर